महाराष्ट्र शासन

# वस्तू व सेवाकर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग, माझगांव,
मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्र.०२२ २३७६०३९२/०३९०/०८७३
ई-मेल आय डी- tatransfer2026@gmail.com

**परि.क्र.सराआ/आस्था-५/कर सहायक/ नियत व आं.क्षे.बदली-२०२६/ ब- 108 मुंबई, दि. 06.03.2026**

## परिपत्रक

**विषय :-** **१. कर सहायकांच्या मे-२०२६ च्या मुंबई क्षेत्रिय नियत बदलीसाठीचे व आंतरक्षेत्रिय नियत बदली (Zone Change) करिताची आवेदने गुगल फॉर्मद्वारे ऑनलाईन पद्धतीने मागविणेबाबत.**
**२. क्षेत्रांतर्गत नियत बदली करीता क्षेत्रिय कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देणेबाबत.**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१४/प्र.क्र.१९८/वि.प्र.-१ मंत्रालय, मुंबई दि.१९.१२.२०२२.
३. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ मंत्रालय, मुंबई दिनांक ०९.०४.२०१८.
४. कर सहायक संवर्गातील विनंती बदलीसाठी या कार्यालयास हे परिपत्रक निर्गमित होईपर्यंत प्राप्त झालेली आवेदनपत्रे.

उपरोक्त संदर्भानुसार महाराष्ट्र शासकीय बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ ला अनुसरून शासनाने सर्वसाधारण बदल्यांकरीता समुपदेशनाद्वारे बदलीबाबतचे धोरण निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

त्यानुषंगाने नियुक्तीच्या पदावर नविन नियुक्ती/पदोन्नती/बदली आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एकाच ठिकाणी (Location) सलग **०६ वर्षे किंवा अधिक कालावधी पूर्ण करीत असलेल्या गट क संवर्गातील** कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात. विभागातील रिक्त पदे, रिक्त पदांचा सर्वदूर समतोल, प्रशासकीय कारणे, बदलीसाठीचे निकष, तसेच ३६० डिग्री छाननी समितीची शिफारस या बाबी विचारात घेवून कर सहायक संवर्गाची नियत बदली प्रक्रीया राबविण्यात येते.

नियत बदल्यांकरिता क्षेत्रीय नियत बदल्या व आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदल्या असे वर्गीकरण करण्यात आले आहे. नियत बदल्या बाबतची कार्यवाही दि.०९.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार करण्यात येईल. मुंबई क्षेत्रातील कर सहायक नियत बदली व आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदली प्रक्रिया विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाद्वारे राबवली जाते. आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदल्या मुंबई सह सर्वच क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सेवेची ०६ वर्षे पूर्ण केली असलेल्या व कार्यरत क्षेत्राबाहेर बदलीस इच्छुक असणाऱ्या उमेदवारांसाठी राबविण्यात येतील. मुंबई क्षेत्र वगळता

अन्य क्षेत्रातील क्षेत्रांतर्गत कर सहायक नियत बदली प्रक्रिया संबंधित क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त कार्यालयांकडून पार पाडणे अपेक्षित आहे..

सदर परिपत्रक सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट –1 मध्ये मुंबई क्षेत्रातील नियतकालिक बदलीसाठी पात्र असलेल्या कर सहायकांची तात्पुरती यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सोबत परिशिष्ट-2 मध्ये कार्यालयनिहाय रिक्त पदांचा तपशील प्रसिध्द करण्यात आला आहे. रिक्त पदांची स्थिती सद्यस्थितीस अनुसरुन असुन प्रत्यक्ष बदली आदेश निर्गमित करतांना त्यावेळेसच्या रिक्त पदांचा विचार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

नियत बदली प्रक्रियेस होणारा विलंब टाळण्यासाठी, प्रक्रियेत पारदर्शकता, गतिशिलता आणण्यासाठी व टंकलेखनातील, नोंदणीतील मानवी चुका टाळण्यासाठी आवेदने गुगल फॉर्म (Google Forms) द्वारे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

केवळ गुगल फॉर्म (Google Form) द्वारे ऑनलाईन पध्दतीने आवेदने मागविणे अनिवार्य (Compulsory) करण्यात आले असून कोणतीही **लिखित स्वरूपातील आवेदन पत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

❖ **<u>महत्वाच्या सूचना</u>:-**

१. **ज्या कर सहायक उमेदवारांनी हे परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी नियतकालिक बदली करीता लेखी स्वरूपात अर्ज योग्य मार्गाने मा.विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई/मा.राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई किंवा विभागाच्या कोणत्याही कार्यालयात सादर केले आहेत, अशा प्रकारचे अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील. सबब अशा अर्जदारांना पुन्हा अर्ज सादर करावयाचा असेल तर त्यांनी केवळ गुगलफॉर्म व्दारेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.**

२. उपरोक्त प्रमाणे नियत कालिक बदलीस पात्र कर सहायक संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर (Gmail) नियतकालीक बदलीसाठीची लिंक पाठवली जाईल. संबंधित लिंकद्वारे उमेदवार मोबाईलवर अथवा कॉम्प्युटरवर नियत बदलीसाठी अर्ज करू शकतील.

३. सदर लिंक एकदाच पाठविण्यात येणार असून उमेदवारांनी सदर लिंकद्वारे अत्यंत काळजीपूर्वक आवेदन सादर करावे. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुन्हा नव्याने Google Form ची लिंक उपलब्ध केल्या जाणार नाही. नियत बदली-२०२६ (मुंबई क्षेत्र) तसेच आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदली करीता अर्जदार दि. २०.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकतील.

४. **गुगलफॉर्म व्दारेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर ई-मेल आयडीवर प्राप्त अर्जाची पोचपावती योग्य मार्गाने (संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांमार्फत) दि. २७.०३.२०२६ रोजीपर्यंत या कार्यालयास सादर करावी. अन्यथा कर सहायक नियत/आंतरक्षेत्रिय नियत बदली-२०२६ प्रक्रियेअंतर्गत बदली करीता त्यांच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.**

५. कर सहायक नियत/आंतरक्षेत्रिय नियत बदलीसाठी अर्ज केलेल्या कर सहायक कर्मचाऱ्यास वैयक्तीक किंवा इतर कारणास्तव विनंती अर्ज मागे घ्यावयाचा असल्यास त्यांनी दि. २३.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राज्यकर सहायक आयुक्त (आस्था-५), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडे **tatransfer2026@gmail.com** या ईमेल आयडीवर कळवावे. नियत/आंतरक्षेत्रिय नियत बदलीसाठी विशिष्ट ठिकाणी केलेला अर्ज उपरोक्त प्रमाणे कर सहायकाने मागे घेतल्यास सदर कर सहायकाची प्रशासनाच्या सोयीनुसार बदली केली जाईल व विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**A ) मुंबई क्षेत्रीय नियत बदली :-**

i. मुंबई क्षेत्रीय कर सहायक नियत बदली-२०२६ प्रक्रियेकरीता मुंबई क्षेत्रात कार्यरत कर सहायकांकडून नियत बदली बाबतच्या गुगल फॉर्म (Google Form) वितरीत करुन ऑनलाईन पध्दतीने आवेदने मागविण्यात येत आहेत.

ii. मुंबई क्षेत्रीय बदलीकरीता आवेदने सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना पुढे नमूद करण्यात आलेल्या आहेत. सदर अर्जाव्दारे मुंबई क्षेत्रातील कर सहायकांना हव्या त्या ठिकाणाचे (मुंबई व मुंबई बाहेर सुध्दा) विकल्प देता येतील.

iii. नियत बदलीस इच्छुक उमेदवारांनी नियत बदलीकरीता कमीत कमी तीन व जास्तीत जास्त दहा प्राधान्यक्रम निवडून फक्त गुगल फॉर्म (Google Form) द्वारेच आवेदन करणे बंधनकारक असेल. **नियत बदलीस पात्र असणाऱ्या कर सहायकांची कर सहायक संवर्गातून राज्यकर निरिक्षक पदोन्नती-२०२६ करिता विचारक्षेत्रात असलेल्या कर सहायकांना कर सहायक नियत बदली-२०२६ मधुन वगळले जाऊ शकतात तरीही त्यांनी गुगल फॉर्म भरून योग्य ते पसंतीक्रम द्यावा.**

मुंबई क्षेत्राच्या अधिनस्थ कार्यालयातील नियत बदली-२०२६ करीता पात्र कर सहायकांच्या बाबतीत संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने बदलीस पात्र कर्मचाऱ्यांची तात्पुरती यादी या परिपत्रकासह जाहीर करण्यात येत आहे

iv. **नियत बदली करीता संबंधित आस्थापना कार्यालयांकडून गुगल फॉर्म (Google Form) ची लिंक पाठविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**B) मुंबई व्यतिरिक्त इतर क्षेत्रातील आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदली :-**

मुंबई क्षेत्राबाहेर कार्यरत नियतकालिक बदलीसाठी पात्र कर सहायकांनी त्यांना आंतरक्षेत्रिय बदली हवी असल्यास त्याबाबत संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांना लेखी कळवून आस्थापना अधिकाऱ्यांमार्फत राज्यकर सहायक आयुक्त (आस्था-५)या कार्यालयास नियतकालिक आंतरक्षेत्रिय बदलीसाठीची आवश्यक गुगल फॉर्म लिंक प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचे (नियतकालिक बदलीसाठी पात्र कर सहायकांचे) Gmail ID, मोबाईल नंबर इ. माहिती **दि. १३.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत** tatransfer2026@gmail.com या ई-मेल आयडी पाठवावी. दि.१३.०३.२०२६ सायंकाळी ५.०० नंतर माहिती प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

i. **आंतरक्षेत्रीय (Zone Change)** बदलीस इच्छुक असलेल्या कर सहायकांनी एकाच ठिकाणी (Location) ०६ वर्षे सेवा पूर्ण केली असल्याची संबंधित आस्थापना अधिकारी यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे.

ii. क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांना केवळ क्षेत्रांतर्गत बदल्या करण्याचे अधिकार प्राप्त असून आंतरक्षेत्रीय (Zone Change)/ क्षेत्राबाहेरील बदल्यांचे अधिकार मा. विशेष राज्यकर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. यास्तव अपर राज्यकर आयुक्त यांनी कर्मचाऱ्यांना ०६ वर्षे पूर्ण झाली असली तरी आंतरक्षेत्रीय (Zone Change)/ क्षेत्राबाहेरील बदल्या करणे अपेक्षित नाही, त्याबाबतची कार्यवाही विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाद्वारेच पूर्ण करण्यात येईल.

iii. आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदलीस इच्छुक उमेदवारांनी नियत बदलीकरीता कमीत कमी तीन व जास्तीत जास्त **दहा** प्राधान्यक्रम निवडून फक्त गुगल फॉर्म (Google Form) द्वारेच आवेदन करणे बंधनकारक असेल.

iv. कर सहायक नियत बदली २०२६ अंतर्गत मुंबई व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील जे कर सहायक नियतबदलीसाठी पात्र आहेत व त्यांना आंतरक्षेत्रिय बदली हवी आहे त्यांनी मा. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडे त्याबाबतचा अर्ज गुगल फॉर्मव्दारे करणे अपेक्षित आहे. सदर अर्जाचा नियुक्ती प्राधिकाऱ्यानी ठरविलेल्या निकषानुसार विचार केला जाईल. या निकषानुसार आंतरक्षेत्रिय बदलीसाठी केलेली विनंती मान्य होईलच असे नाही. सबब ऐनवेळी अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित कर सहायक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रिय स्तरावर सुरु असलेल्या नियतकालिक बदली प्रक्रियेत त्यांना अन्य सोयीचे (आंतरक्षेत्रिय बदली व्यतिरिक्त) ठिकाण मिळविण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या नियतकालिक बदल्यांबाबतच्या सूचनांना अनुसरुन त्यास्तरावर देखील योग्य प्रकारे अर्ज दाखल केले जातील याची दक्षता घ्यावी.

**परंतु, सदर कर सहायक कर्मचाऱ्याची आंतरक्षेत्रिय नियत बदली विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडून मंजूर झाल्यास मात्र संबंधित कर सहायकांचा क्षेत्रांतर्गत नियत बदलीसाठी विचार करण्यात येऊ नये.**

**गुगल फॉर्मव्दारे अर्ज करण्यासाठी अर्जदारांना आणि आस्थापना अधिकारी यांना द्यावयाच्या सुचना परिशिष्ट-४ मध्ये सोबत जोडलेल्या आहे.**

## C) क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त यांना बदलीबाबत मार्गदर्शक सूचना :-

१. मुंबई व्यतिरिक्त इतर क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त यांना त्यांच्या संबंधित क्षेत्रांतर्गत नियत बदली बाबत या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत -

i. सर्व क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांनी क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या बदल्यांसंदर्भातही संदर्भीय दि.०९.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार धोरण अवलंबवावे.

ii. संदर्भ क्र. ४ येथील या कार्यालयाच्या आदेशानुसार गट-क मधील कर्मचाऱ्यांची क्षेत्रांतर्गत नियतकालिक बदली करण्याचे मा.विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिकार संबंधित क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत, जेणेकरुन क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्तांना त्यांचे कार्यक्षेत्रांतर्गत कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कर सहायक संवर्गातील मनुष्यबळाचे क्षेत्रांतर्गत व्यवस्थापन करणे शक्य व्हावे.

iii. सर्व क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांनी क्षेत्रिय स्तरावर बदली करत असतांना शासननिर्णय दि.०९.०४.२०१८ च्या परिशिष्ट-१ मधील मुद्दा क्र.२ नुसार- सध्याच्या पदस्थापनेच्या ठिकाणी केलेल्या सेवेच्या कालावधीच्या ज्येष्ठतेनुसार यादी तयार करावी, त्यानंतर सदर यादीतील, संबंधित संवर्गातील कार्यरत पदांच्या ३०% च्या मर्यादेत बदलीस पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचीच ज्येष्ठतेनुसार यादी प्रसिध्द करावी. तसेच क्षेत्रांतर्गत कार्यालयनिहाय रिक्त पदांची संख्या प्रसिध्द करावी.

iv. दिनांक ३१.०५.२०२६ रोजी एकाच ठिकाणी (Location) कार्यालयात ०६ वर्षे वा त्यापेक्षा जास्त कालावधी पूर्ण होणाऱ्या कर सहायक कर्मचाऱ्यांच्या मे २०२६ च्या क्षेत्रांतर्गत नियतकालिक बदल्या संबंधित क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांनी करणे अपेक्षित आहे.

v. सन २०२६ च्या क्षेत्रांतर्गत नियतकालिक बदलीस पात्र ज्या कर सहायकांचे एकाच ठिकाणी (Location) ०६ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झालेली असेल, अशा कर्मचाऱ्याचे ठिकाण (Location) बदलले जाईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दि.३१.०५.२०२६ रोजीपर्यंत एकाच ठिकाणी (Location) ०६ वर्षे पुर्ण झालेली नाही, अशा कर्मचाऱ्यांचा बदलीबाबत क्षेत्रिय स्तरावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येऊ नये.

vi. कोणत्याही परिस्थितीत कर्मचाऱ्यांना विशिष्ट कार्यशाखेत बदलीसाठी विनंती करता येणार नाही. विशिष्ट कार्यशाखेत बदलीसाठी विनंती केल्यास ती विनंती ग्राह्य धरली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

vii. सर्व क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांनी क्षेत्रिय स्तरावर बदली करत असतांना सदर प्रक्रिया ही मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या कर सहायक बदली प्रक्रीया २०२६ सोबत सुसंगत राहील, याची दक्षता घ्यावी.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक ३१.०१.२०१४ नुसार गट-ब (अराजपत्रित) व गट-क प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी क्षेत्रिय अपर राज्यकर आयुक्त यांचे स्तरावर **नागरी सेवा मंडळ (२)** स्थापन करण्यात येवून या मंडळासमोर नियत बदलीचा प्रस्ताव शिफारशीकरिता सादर करण्यात यावा व शिफारशी प्राप्त झाल्यानंतर नियत बदली आदेश निर्गमित करण्यात यावेत. **मात्र सदरचे नियत बदली आदेश मा. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या नियत बदली आदेशानंतरच निर्गमित करण्यात यावेत.**

३. कर सहायक नियत बदली २०२६ अंतर्गत मुंबई व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील जे कर सहायक नियतबदलीसाठी पात्र आहेत व त्यांना आंतरक्षेत्रिय बदली हवी आहे त्यांनी मा. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडे त्याबाबतचा अर्ज गुगल, फॉर्मव्दारे करणे अपेक्षित आहे. सदर अर्जाचा नियुक्ती प्राधिकाऱ्यानी ठरविलेल्या निकषानुसार विचार केला जाईल. या निकषानुसार आंतरक्षेत्रिय बदलीसाठी केलेली विनंती मान्य होईलच असे नाही. सबब ऐनवेळी अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित कर सहायक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रिय स्तरावर सुरु असलेल्या नियतकालिक बदली प्रक्रियेत त्यांना अन्य सोयीचे (आंतरक्षेत्रिय बदली व्यतिरिक्त) ठिकाण मिळविण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या नियतकालिक बदल्यांबाबतच्या सूचनांना अनुसरुन त्यास्तरावर देखील योग्य प्रकारे अर्ज दाखल केले जातील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आस्थापना अधिकारी व संबंधित कर सहायकांना देण्यात आलेल्या आहेत.

**परंतु, सदर कर सहायक कर्मचाऱ्याची आंतरक्षेत्रिय नियत बदली विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडून मंजूर झाल्यास मात्र संबंधित कर सहायकांचा क्षेत्रांतर्गत नियत बदलीसाठी विचार करण्यात येऊ नये.**

४. आपल्या कार्यक्षेत्रातील कर सहायकांचे क्षेत्रांतर्गत नियत बदली आदेश निर्गमित करून त्या आदेशाच्या प्रती माहितीस्तव या कार्यालयास सादर करण्यात याव्यात.

हे परिपत्रक वस्तू व सेवाकर विभागातील सर्व संबंधित राज्यकर सहआयुक्त/आहरण व संवितरण अधिकारी/आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्या विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर परिपत्रक **mahagst.gov.in** या संकेतस्थळावर **what's new** या सदराखाली उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने).**

संजय निकम
**राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

सहपत्र- १. नियत बदलीस पात्र कर्मचारी यादी. (मुंबई क्षेत्र)
२. रिक्त पदांची यादी
३. विवरणपत्र (Annexure) भरण्याबाबतच्या सर्वसाधारण सूचना.

**प्रत सादर :-** १. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सर्व संबंधित अपर राज्यकर आयुक्त.
३. सर्व संबंधित राज्यकर सहआयुक्त (प्रशासन).
४.सर्व संबंधित आस्थापना अधिकारी.

परिशिष्ट - १

मुंबई क्षेत्रातील नियतकालिक बदली २०२६ साठी पात्र कर सहायकांची यादी

| अ.क्र | NAME OF TA | DATE OF JOINING | CURRENT OFFICE | zone wise | TENURE IN PRESENT DIVISION AS ON ३१.०५.२०२६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.रोहित शांताराम लोखंडे | ०३.०८.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 9 MONTHS, 28 DAYS |
| २ | श्री.प्रणव लक्ष्मीकांत पाटील | ०८.०८.२०१९ | नोडल-२ | zone १, mumbai | 6 YEARS, 9 MONTHS, 23 DAYS |
| ३ | श्री.सोलंके संदीप अशोक | ०९.०८.२०१९ | नोडल-५ | zone २, mumbai | 6 YEARS, 9 MONTHS, 22 DAYS |
| ४ | श्री.संतोष जगन्नाथ जाधव | २९.०८.२०१९ | मुंबई विक्रीकर कायदा | मुंबई विक्रीकर कायदा | 6 YEARS, 9 MONTHS, 02 DAYS |
| ५ | श्री.ताराचंद पवार | २०.०८.२०१९ | नोडल-४ | zone २, mumbai | 6 YEARS, 9 MONTHS, 11 DAYS |
| ६ | श्री.प्रमोद पंढरी कराड | २४.०९.२०१९ | नोडल-११ | zone ४, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 07 DAYS |
| ७ | श्री.बाळू हानुमंत तांबे | १७.०९.२०१९ | अन्वेषण-अ,ब,क | अन्वेषण-अ,ब,क | 6 YEARS, 8 MONTHS, 14 DAYS |
| ८ | श्री.दत्तात्रय अशोकराव लोथे | १६.०९.२०१९ | नोडल-१३ | zone ५, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 15 DAYS |
| ९ | श्री.सागर दिलीप पाटील | २१.०९.२०१९ | अन्वेषण-अ,ब,क | अन्वेषण-अ,ब,क | 6 YEARS, 8 MONTHS, 10 DAYS |
| १० | श्री.हुंदळेकर सुहास अनंदा | ०१.१०.२०१९ | नोडल-७ | zone ३, mumbai | 6 YEARS, 7 MONTHS, 30 DAYS |
| ११ | श्री.नितीन विठ्ठलराव दुर्गे | ०९.०९.२०१९ | नोडल-१ | zone १, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 22 DAYS |
| १२ | श्री.सतीश राजेभाऊ शेरे | ०९.०९.२०१९ | नोडल-४ | zone २, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 22 DAYS |
| १३ | श्री.ज्ञानदेव गणपतराव आळंदकर | ११.०९.२०१९ | नोडल-१४ | zone ५, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 20 DAYS |
| १४ | श्री.निखिल किशोर महल्ले | १६.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 15 DAYS |
| १५ | श्री.दत्तात्रय श्रीकृष्ण माने | २९.०८.२०१९ | नोडल-१३ | zone ५, mumbai | 6 YEARS, 9 MONTHS, 02 DAYS |
| १६ | श्री.सागर दिलीप राजेभोसले | ३१.०८.२०१९ | pro | PRO | 6 YEARS, 9 MONTHS, 00 DAYS |
| १७ | श्री.बापुराव रंगनाथ काकडे | ०१.१०.२०१९ | अन्वेषण-अ,ब,क | अन्वेषण-अ,ब,क | 6 YEARS, 7 MONTHS, 30 DAYS |
| १८ | श्री.सागर रमेश ठाकूर | १९.०९.२०१९ | अन्वेषण-अ,ब,क | अन्वेषण-अ,ब,क | 6 YEARS, 8 MONTHS, 12 DAYS |
| १९ | श्री.विकास सुभाष सातव | १७.०९.२०१९ | pt | PT | 6 YEARS, 8 MONTHS, 14 DAYS |
| २० | श्री.निलेश विजय जाधव | ०१.१०.२०१९ | नोडल-९ | zone ३, mumbai | 6 YEARS, 7 MONTHS, 30 DAYS |
| २१ | श्री.जयदीप अशोक आव्हाड | ३०.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 01 DAYS |
| २२ | श्री.गर्जे योगेश सुभाष | १९.०९.२०१९ | नोडल-७ | zone ३, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 12 DAYS |
| २३ | श्री.किरण पोपट रोटे | ०३.१०.२०१९ | नोडल-२ | zone १, mumbai | 6 YEARS, 7 MONTHS, 28 DAYS |
| २४ | श्री.अक्षय रमेश जावळे | ०३.०९.२०१९ - | नोडल-१२ | zone ४, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 28 DAYS |
| २५ | श्री.नादरगे कुलदीप देविदास | २४.०९.२०१९ | नोडल-८ | zone ३, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 07 DAYS |
| २६ | श्रीम. शुभांगी दिगांबर पातडे | २५.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 06 DAYS |
| २७ | श्री.महेश समाधान तिवणे | १७.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 14 DAYS |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | श्री.तिरपुडे जीवन दामचरण | ११.१०.२०१९ | नोडल-८ | zone ३, mumbai | 6 YEARS, 7 MONTHS, 20 DAYS |
| २९ | श्री.ज्ञानेश्वर माणिक बनकर | १०.०१.२०२० | नोडल-२ | zone १, mumbai | 6 YEARS, 4 MONTHS, 21 DAYS |
| ३० | श्री.प्रमोद लोटन पाटील | १६.०९.२०१९ | नोडल-१३ | zone ५, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 15 DAYS |
| ३१ | श्री.मिलिंद चंद्रकांत खरात | १८.११.२०१९ | नोडल-१३ | zone ५, mumbai | 6 YEARS, 6 MONTHS, 13 DAYS |
| ३२ | श्री.जयश्री रामदास शिवेकर (नलावडे) | २६.११.२०१९ | नोडल-६ | zone २, mumbai | 6 YEARS, 6 MONTHS, 05 DAYS |
| ३३ | श्री.राजेश शिवाजी जगताप | २३.०९.२०१९ | नोडल-४ | zone २, mumbai | 6 YEARS, 8 MONTHS, 08 DAYS |
| ३४ | श्री.योगेश अदिनाथ शिंदे | १६.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 15 DAYS |
| ३५ | श्री.विजय दयाराम मोहिते | ०४.०९.२०१९ | pro | PRO | 6 YEARS, 8 MONTHS, 27 DAYS |
| ३६ | श्री.सचिन भगवान सोनवणे | ०३.१०.२०१९ | अन्वेषण-अ,ब,क | अन्वेषण-अ,ब,क | 6 YEARS, 7 MONTHS, 28 DAYS |
| ३७ | श्री.मनोज रामू ठाकरे | २५.०९.२०१९ | pro | PRO | 6 YEARS, 8 MONTHS, 06 DAYS |
| ३८ | श्री.कल्याणकर कुणाल हरीष | १०.१०.२०१९ | नोडल-७ | zone ३, mumbai | 6 YEARS, 7 MONTHS, 21 DAYS |
| ३९ | श्री.गोविंद अरुण वाघमारे | ३०.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 01 DAYS |
| ४० | श्रीम.पुजा दत्ताराम जाळगांवकर | २०.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 11 DAYS |
| ४१ | श्री.नाईक विनायक विठ्ठल | ०७.१०.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 7 MONTHS, 24 DAYS |
| ४२ | श्रीम.सुप्रिया वसंत घाडी | २५.०९.२०१९ | cst | cst | 6 YEARS, 8 MONTHS, 06 DAYS |
| ४३ | श्रीम. हसरत जहाँ याकुब नाईक | १३.०३.२०२० | spcst | spcst | 6 YEARS, 02 MONTHS, 18 DAYS |
| ४४ | श्री.गायकर तन्मय विद्याधर | ०७.०४.२०१९ | नोडल-५ | zone २, mumbai | 7 YEARS, 1 MONTHS, 24 DAYS |

संजय निकम

राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)

महाराष्ट्र राज्य, मुंबई

## परिशिष्ट - २

# कर सहायक संवर्गाची कार्यालयनिहाय रिक्त पदांची संख्या

| दि. २८.०२.२०२६ पर्यंतच्या कर सहायक संवर्गातील रिक्त पदांच्या माहितीचा तक्ता | | |
|---|---|---|
| विभाग | कार्यालय | रिक्त पदे |
| मुंबई | माझगांव,मुंबई | ३५७ |
| | वांद्रे,मुंबई | ४५ |
| | **एकूण** | **४०२** |
| विभाग | कार्यालय | रिक्त पदे |
| ठाणे | ठाणे शहर | ७४ |
| | भाईंदर | ४० |
| | पालघर | ८ |
| | **एकूण** | १२२ |
| रायगड | | |
| | कल्याण | ४९ |
| | अलिबाग | ८ |
| | रायगड | ७८ |
| | एकूण | १३५ |
| पुणे | पुणे | २६२ |
| | **एकूण** | **२६२** |
| नाशिक | नाशिक | ३५ |
| | मालेगांव | ९ |
| | अहिल्यानगर | २१ |
| | धूळे | ७ |
| | जळगांव | २४ |
| | नंदूरबार | ३ |
| | **एकूण** | **९९** |
| छ.संभाजीनगर | छ.संभाजीनगर | १८ |
| | जालना | १२ |
| | बीड | ४ |
| | लातूर | ४ |
| | परभणी | ० |
| | हिंगोली | २ |
| | नांदेड | २ |
| | धाराशिव | ० |
| | **एकूण** | ४२ |
| विभाग | कार्यालय | रिक्त पदे |
| | कोल्हापूर | ३५ |
| | सांगली | ०८ |
| | रत्नागिरी | ११ |

| | | |
|---|---|---|
| कोल्हापूर | ओरस | ८ |
| | सोलापूर | २२ |
| | बार्शी | २ |
| | सातारा | १४ |
| | **एकूण** | **१००** |
| नागपूर | नागपूर | ७८ |
| | वर्धा | ७ |
| | चंद्रपूर | ७ |
| | गडचिरोली | २ |
| | गोंदिया | ५ |
| | भंडारा | ५ |
| | अमरावती | ३ |
| | अकोला | ५ |
| | खामगांव | ८ |
| | यवतमाळ | ५ |
| | वाशिम | ० |
| | **एकूण** | **१२५** |

| **विभाग** | **रिक्त पदे** |
|---|---|
| मुंबई | ४०२ |
| ठाणे | १२२ |
| रायगड | १३५ |
| पुणे | २६२ |
| नाशिक | ९९ |
| छ.संभाजीनगर | ४२ |
| कोल्हापूर | १०० |
| नागपूर | १२५ |
| **एकूण** | **१२८७** |

वरील रिक्त पदे ही दि.२८.०२.२०२६ रोजीच्या स्थितीस अनूसरून असुन, यामध्ये सरळसेवा नियुक्ती , कर सहायक-२०२४ नियुक्ती ,वर्ग-४ ते कर सहायक पदावर पदोन्नती त्याचप्रमाणे विविध इतर पदांवर कर सहायक या पदावर निवड होऊन कार्यमुक्त होणे इ. विविध कारणास्तव संभाव्य बदल होऊ शकतो.

**संजय निकम**
**राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

## परिशिष्ट -३

***गुगल फॉर्मद्वारे अर्ज प्रक्रियेबाबत आस्थापना अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या सुचना :-**

नियत बदली-२०२६ करीता पात्र (०६ वर्षे पूर्ण) कर सहायकांनी संबंधित ठिकाणी (Location) ०६ वर्षे सेवा पूर्ण केली असल्याची आस्थापना अधिकारी यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे. **तसेच या परिपत्रकासोबत मुंबई विभागात ०६ वर्षे सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी जोडण्यात आली आहे. मुंबई विभागातील आस्थापना अधिकारी यांना सुचित करण्यात येत आहे की, या उमेदवारांव्यतिरिक्त संबंधित आस्थापना अधिकारी यांच्या आस्थापनेवरील इतर कर सहायक नियत बदली-२०२६ करीता (०६ वर्षे पूर्ण) पात्र ठरत असतील तर त्यांचीसुद्धा माहिती या कार्यालयास पाठविण्यात यावी. मुंबई विभागात नियत बदलीस पात्र असूनही ज्या कर सहायकांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली नाही त्याबाबत संबंधित आस्थापना अधिकारी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. मुंबई विभागाव्यतिरिक्त इतर विभागात ६ वर्षे पुर्ण झालेल्या कर सहायकांचे बदलीचे अधिकार संबंधित अपर राज्यकर आयुक्त यांना असल्याने त्या विभागातील नियतकालीक बदलीस पात्र असणाऱ्या कर सहायकांच्या बाबतीत संबंधित अपर राज्यकर आयुक्त कार्यालय स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.**

संबंधित आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्याकडे आलेले सर्व नियत बदलीच्या अर्जाच्या सोबत Upload करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेची शहानिशा करतील. तसेच उमेदवारांनी सादर केलेल्या पोचपावती दि.२७.०३.२०२६ पूर्वी कार्यालयाच्या पत्रासह प्रमाणित करून सहायक राज्यकर आयुक्त (आस्थापना-५), माझगांव, मुंबई यांचे कार्यालयात सादर करतील. दि. २७.०३.२०२६ नंतर वस्तू व सेवाकर कार्यालयांनी सहायक राज्यकर आयुक्त कार्यालय (आस्थापना-०५), मुंबई कार्यालयास पाठविलेल्या आवेदन पत्रांची पोचपावती दप्तरी दाखल केल्या जातील व त्यांचा कर सहायक २०२६ नियत बदलीसाठी विचार केला जाणार नाही.

कर सहायक नियत बदली २०२६ अंतर्गत मुंबई व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील जे कर सहायक नियतबदलीसाठी पात्र आहेत व त्यांना आंतरक्षेत्रिय बदली हवी आहे त्यांनी मा. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडे त्याबाबतचा अर्ज गुगल फॉर्मव्दारे करणे अपेक्षित आहे. **सदर गुगल फॉर्मची लिंक कर सहायक नियत बदली-२०२६ पात्र कर सहायकांना त्यांच्या अधिकृत E-mail ID वर पाठवण्यात येईल.** सदर अर्जाचा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी ठरविलेल्या निकषानुसार विचार केला जाईल. या निकषानुसार आंतरक्षेत्रिय बदलीसाठी केलेली विनंती नामंजूर होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. सबब ऐनवेळी अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित कर सहायक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रिय स्तरावर सुरु असलेल्या नियतकालिक बदली प्रक्रियेत त्यांना अन्य सोयीचे (आंतरक्षेत्रिय बदली व्यतिरिक्त) ठिकाण मिळविण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या नियतकालिक बदल्यांबाबतच्या सूचनांना अनुसरुन त्यास्तरावर देखील योग्य प्रकारे अर्ज दाखल केले जातील याची दक्षता घ्यावी. ही बाब आस्थापना अधिकारी यांनी संबंधित कर सहायकांच्या निदर्शनास आणून द्यावी.परंतु, **सदर कर सहायक**

**कर्मचाऱ्याची आंतरक्षेत्रिय नियत बदली विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाकडून मंजूर झाल्यास मात्र संबंधित कर सहायकांचा क्षेत्रांतर्गत नियत बदलीसाठी विचार करण्यात येऊ नये.**

**महत्त्वाची सुचना :-** ज्या कर सहायक उमेदवारांनी हे परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी बदलीकरिता लेखी स्वरूपात अर्ज योग्य मार्गाने मा.विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई यांना सादर केले आहेत, त्या कर्मचाऱ्यांनी सुध्दा **पुनःश्च** Google Form द्वारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करून ई-मेल आयडीवर प्राप्त नियत बदली अर्जाची पोचपावती योग्य मार्गाने सादर करावी लागेल, **अन्यथा कर सहायक नियत बदली-२०२६ व आंतरक्षेत्रीय (Zone Change) नियत बदली करीता त्यांचे पसंतीक्रमाचा विचार केला जाणार नाही. ही बाब आस्थापना अधिकारी यांनी संबंधित कर सहायकांच्या निदर्शनास आणून द्यावी.**

## *गुगल फॉर्मद्वारे अर्ज करण्याकरीता अर्जदारांना सुचना :-

मुंबई क्षेत्रातील नियत बदलीस पात्र उमेदवारांना उपरोक्त नमूद प्रमाणे राज्यकर सहायक आयुक्त (आस्थापना-५), माझगांव, मुंबई यांचे कार्यालयाकडून Google Form ची लिंक उपरोक्त प्रमाणे नियत कालिक बदलीस पात्र कर सहायक संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर (Gmail) पाठवली जाईल. संबंधित लिंकद्वारे उमेदवार मोबाईलवर अथवा कॉम्प्युटरवर नियत बदलीसाठी अर्ज करू शकतील.

मुंबई क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील नियत बदलीस पात्र व आंतरक्षेत्रिय नियत बदलीस इच्छुक उमेदवारांच्या ईमेल व मोबाईल नंबर बाबतची माहिती संबंधित आस्थापना अधिकारी हे राज्यकर सहायक आयुक्त (आस्थापना-५), माझगांव, मुंबई यांना दि.१३.०३.२०२६ सायंकाळी ५.०० पर्यंत tatransfer2026@gmail.com या ई-मेल आयडी वर कळवतील. त्यानंतर सहायक राज्यकर आयुक्त (आस्थापना-५), माझगांव, मुंबई कार्यालयाकडून Google Form ची लिंक आंतरक्षेत्रिय नियत बदलीस इच्छुक उमेदवारांच्या नोंदणीकृत ई-मेलवर (Gmail) पाठवली जाईल. संबंधित लिंकद्वारे उमेदवार मोबाईलवर अथवा कॉम्प्युटरवर नियत बदलीसाठी अर्ज करू शकतील.

१. Email Address :- सर्वप्रथम ई-मेल ॲड्रेस (Email Address) या सदराखाली आपला ई-मेल नोंदवावा.(टीप - यात नोंदवलेल्या ई-मेलवर आपल्याला पोचपावती प्राप्त होईल.)
२. **श्री./श्रीम.-** नमूद करावे.
३. **कर्मचाऱ्याचे नाव:-** या सदराखाली कॅपिटलमध्ये आपले संपूर्ण नाव नोंदवावे. (आडनाव प्रथम) (e.g. TENDULKAR SACHIN RAMESH)
४. **जन्मतारीख :-** स्वत:ची अचूक जन्मतारीख (DD/MM/YYYY मध्ये) नोंदवावी. Eg. २०/०१/१९९०.
५. Mobile Number :- या सदराखाली आपला सध्याचा सुरु असलेला Mobile Number नोंदवावा. मोबाईल नंबर अचूक नोंदवणे आवश्यक आहे.
६. **कर्मचाऱ्याचा सेवार्थ ID**:- या सदराखाली आपला सेवार्थ ID नोंदवावा.
७. **सध्याच्या पदावर कार्यरत असलेले कार्यालय व ठिकाण :-** सध्या कोणत्या कार्यालयात कार्यरत आहे ते कार्यालय निवडावे. Eg. COMMISSIONER OFFICE, MUMBAI, NODAL-०३ AND AUDIT-०१.
८. **सध्याच्या पदावर रुजू झालेला दिनांक :-** (DD/MM/YYYY मध्ये) नोंदवावा. Eg. १५/१०/२०१७.
९. **आत्तापर्यंतच्या सेवेचा तपशील :-**

१. प्रथम मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.
२. प्रथम मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.
३. द्वितीय मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी प्रथम मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.
४. द्वितीय मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी प्रथम मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.
५. तृतिय मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी द्वितीय मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.
६. तृतिय मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी द्वितीय मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.

१०. INV **(अन्वेषण शाखा)** काम करण्यास अनुत्सूक आहात का ? :- या सदराखाली होय/नाही असा पर्याय निवडावा.

११. यापूर्वी अन्वेषण शाखेत काम केले आहे काय ?:- या सदराखाली होय/नाही असा पर्याय निवडावा.

१२. अन्वेषण शाखेतला कालावधी:- या सदराखाली कर्मचाऱ्यांने लिपीक व कर सहायक या पदासाहित कालावधी नमूद करावा.

१३. **कर सहायकांचा मुंबई विभागातील (माझगांव/बांद्रा कार्यालयातील) सलग कालावधी.** :- या सदराखाली कर्मचाऱ्यांचा लिपिक/कर सहायक या पदावरच्या मुंबई विभागातील सलग कालावधीसह नमुद करावा.
उदा. क्ष हा कर्मचारी सन २०२० ते २०२३ पर्यंत शिपाई पदावर मुंबई विभागात कार्यरत होता. नंतर कर सहायक पदोन्नतीने २०२३ ते २०२६ पर्यंत मुंबई विभागात कार्यरत होता. तर क्ष ह्या कर्मचाऱ्याचा मुंबई विभागातील सलग कालावधी हा ६ वर्ष होईल.

१४. **कर्मचारी बदली पासून सुट मिळण्यास पात्र असल्यास त्याबाबतची कारणे :-** या सदराखाली कर्मचारी जर सुटिस पात्र असेल तर पहिल्या तीन पर्यायापैकी ज्यास पात्र आहे तो पर्याय निवडावा. जर सुटीस पात्र नसेल तर चौथा पर्याय निवडावा.

१५. **कर्मचारी कोणत्या प्राधान्यक्रमांकात अंतर्भूत होतो याबाबतची माहिती :-** या सदराखाली १ ते ८ प्राधान्यक्रमांकापैकी जे प्राधान्यक्रम कर्मचाऱ्यास लागू होतात ते पर्याय निवडावे. जर कोणत्याही प्राधान्यक्रमात अंतर्भूत होत नसेल तर नववा पर्याय निवडावा.

१६, १७ & १८ **कागदपत्रांचे पुरावे** - कर्मचारी ज्या प्राधान्यक्रमात अंतर्भूत होतो त्या संबंधिची सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र किंवा कागदपत्रांचे पुरावे या सदरामध्ये फक्त PDF स्वरूपातच जोडावे. (PDF ची जास्तीत जास्त SIZE ही १० MB असावी. केवळ एकच PDF जोडता येवू शकेल.)

१९. **पसंतीक्रम :-** सर्वसाधारण बदली ज्या ठिकाणी हवी असेल त्या ठिकाणाचा/कार्यालयाचा पसंतीक्रम निवडावा. १० पसंतीक्रमापैकी किमान ०३ पसंतीक्रम नोंदविणे आवश्यक आहे.

२०. **आपले नाव ०१.०१.२०२५ च्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ट आहे किंवा नाही.**

२१. **सेवाज्येष्ठता यादीतील अनुक्रमांक (०१.०१.२०२५ च्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीनुसार) :-**

२२. **स्व-प्रमाणित घोषणापत्र :-** कर्मचाऱ्याने नोंदवलेली माहिती व कागदपत्रे ही खरी असून जर यामध्ये सादर केलेली कागदपत्रे खोटी/ बनावट व शासनाची दिशाभूल कर्ण्याकरीता फेरफार केलेली आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस कर्मचारी हा स्वत: जबाबदार असेल. अशा पध्दतीचे घोषणापत्र अर्ज करणाऱ्या कर्मचाऱ्याने देणे हे अनिवार्य आहे.

२३. **कर्मचाऱ्याची स्वाक्षरी :-** कर्मचाऱ्याने अर्ज SUMBIT केल्यानंतर त्यांना सदर अर्जाची पोचपावती ही त्यांच्या अधिकृत Email ID वर मिळेल. INBOX मधून हा Email Open करून त्या पोचपावतीची (अर्जाची) PRINT काढून या सदरामध्ये स्वत:ची सही करावी व पोचपावती (अर्ज) आपल्या आस्थापना अधिकाऱ्याकडे

जमा करावी. तसेच अर्जाच्या सोबत Upload करण्यात आलेल्या कागपत्रांच्या सत्यप्रती आस्थापना अधिकाऱ्यांना तपासणीकरीता सादर करावीत.

२४. **आस्थापना अधिकाऱ्याची स्वाक्षरी :-** कर्मचाऱ्यांनी आस्थापना अधिकाऱ्यांना पोचपावती सादर केल्यानंतर संबंधित आस्थापना अधिकारी यांनी अर्जाच्या सोबत Upload करण्यात आलेल्या कागपत्रांच्या सत्यप्रती तपासाव्या. त्यानंतर या सदरामध्ये स्वत:ची स्वाक्षरी करून केवळ ही पोचपावतीच राज्यकर सहायक आयुक्त आस्थापना-५, माझगांव, मुंबई या कार्यालयात **दिनांक २७.०३.२०२६ पूर्वी** सादर करावी.

२५. **नियत बदलीपात्र कर सहायक सध्या कोणत्या परिक्षेत्रात कार्यरत आहेत:-** या सदराखाली नियत बदली पात्र कर सहायक मुंबई कार्यालयात कार्यरत असले तर **मुंबई** विकल्पाची निवड करावी आणि इतर परिक्षेत्रात कार्यरत असेल तर त्या कर सहायकांनी **मुंबई व्यतिरिक्त** इतर या विकल्पाची निवड करावी.

संजय निकम

**राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)**

**महाराष्ट्र राज्य,मुंबई**